# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## प्रवेश सुचना

जा. क्र. नि.कृ.शि./प्रवेश/ १९२ /२०१३ दिनांक : १५ जुन, २०१३

या विद्यापीठांतर्गत शासकिय अनुदानित (घटक/संलग्न) कृषि तंत्र विद्यालयामध्ये कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम (दोन वर्षाचा–मराठी माध्यम) आणि खाजगी संस्थांमार्फत कायम विना अनुदानित तत्वावर चालणाऱ्या विद्यालयामध्ये जुना अभ्यासक्रम उन्नत करुन कृषि तंत्र निकेतन पदविका अभ्यासक्रम (तिन वर्षाचा–अर्ध इंग्रजी माध्यम) या दोन्ही अभ्यासक्रासाठी वर्ष २०१३–२०१४ करीता एस.एस.सी. (१०वी) परिक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांकडून ऑन–लाईन प्रवेश अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रवेश प्रक्रियेची संपूर्ण माहिती महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (मज्ञाम), पुणे यांच्या **http://oasis.mkcl.org/agridiploma** व विद्यापिठाच्या **http://www.pdkv.ac.in** या संकेतस्थळांवर आणि म.ज्ञा.म. च्या अधिकृत ALC केंद्रावर विक्रीस उपलब्ध असलेल्या माहिती पुस्तिकेत देण्यात आलेली आहे.

केंद्रिय प्रवेशासंबंधीची माहिती पुस्तिका व अर्ज विक्री सुरू होण्याची दिनांक १७.०६.२०१३ (म.ज्ञा.म. च्या ALC केंद्रावरून प्राप्त करावे) आणि अर्ज विक्री व ऑन–लाईन अर्ज भरणेची अंतीम दिनांक ०८.०७.२०१३ आहे.

**प्रवेशाबाबत महत्वाच्या सुचना :–**

१) अर्जदारांनी ऑन–लाईन प्रवेश अर्ज करण्यासाठी मृ.ज्ञा.म. च्या http://oasis.mkcl.org/agridiploma या संकेतस्थळावर भेट दयावी अथवा म.ज्ञा.म. ने नेमुन दिलेल्या आपल्या जिल्ह्यातील अधिकृत **ALC** केंद्रावर संपर्क साधावा. दोन्ही अभ्यासक्रमाकरिता एकच अर्ज भरावा मात्र विकल्प दोन्ही अभ्यासक्रमाकरिता तसेच जिल्ह्यातील सर्व विद्यालय/निकेतन यांचे करिता देता येऊ शकतो.

२) अर्जदाराला अर्ज व केंद्रिय प्रवेशासंबंधीची माहिती पुस्तिका रोखीने रक्कम रू. २५/– (रू. पंचवीस) भरून म.ज्ञा.म. च्या अधिकृत ALC केंद्रावर अथवा म.ज्ञा.म. चे संकेतस्थळावर मिळेल. जिल्हा ठरविण्याचे निकष, जिल्ह्यातील कृषि तंत्र विद्यालये व निकेतने, फी, जास्तीच्या गुणांकाचा अधिभार, प्रवेश पात्रता, प्रवेश क्षमता, आरक्षण, प्रवेश प्रणाली वेळापत्रक इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव माहिती पुस्तिकेत आहे.

३) अर्जदाराने संपूर्ण भरलेला प्रवेश अर्ज म.ज्ञा.म. च्या अधिकृत ALC केंद्रावर अथवा भारतीय स्टेट बॅकेचे चलन भरुन अथवा इंटरनेट बॅकींग (फक्त ॲक्सीस बॅक खातेदारांकरीता) द्वारे अथवा डेबीट/क्रेडीट कार्ड द्वारे भरुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत (Attested) प्रतींसह मृ.ज्ञा.म. च्या अधिकृत ALC केंद्रावर जमा करुन पोहोच घ्यावी. अर्ज दाखल करण्यासाठी भरावयाचे शुल्क

खुला संवर्ग– रू. ३००/– व राखीव संवर्ग– रू. १५०/– (अ.जा., अ.ज., वि.जा.*, भ.ज.*, इ.मा.व.*, वि.मा.व.*,)

[*उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य]

४) प्रवेशाची चौथी फेरी – स्थळ प्रवेशापर्यंत (Spot Admission) उमेदवारास जिल्ह्याचे बंधन राहील.

५) मान्यताप्राप्त विना अनुदानीत खाजगी कृषि तंत्र निकेतनांनी/संस्थांनी आपल्या स्तरावर तुरंत स्वतंत्र जाहिरात देऊन अर्जदारांना मज्ञामकडे अर्ज ऑन–लाईन भरावयास सांगावे.

६) म.ज्ञा.म. च्या जिल्हानिहाय अधिकृत ALC केंद्रांची नांवे व दुरध्वनी क्रमांक महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (मज्ञाम), पुणे यांच्या **http://oasis.mkcl.org/agridiploma** व विद्यापिठाच्या **http://www.pdkv.ac.in** या संकेतस्थळांवर उपलब्ध आहेत.

स्वाक्षरीत/–
कुलसचिव
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.